पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव.
'नियमित जनसंपर्क'विभाग,
दुरध्वनी क्रंमाक-8007269000
ईमेल नं.-jansampark.osd@gmail.com

'नियमित प्रसिध्दी पत्रक'(प्रेस नोट)' मंगळवार' दि.27.10.2026

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.26 ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण 189 कारवाया करुन 1,39,950 ₹'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

" अवैध मद्य विरोधी कारवाई."

धाराशिव शहर पोलीस ठाणे: आरोपी नामे-अनिल अशोक आसलेकर, वय 49 वर्षे, रा.देशपांडे स्टॅण्ड मोहिते गल्ली धाराशिव ता. जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 11.30 वा. सु.देशपांडे स्टॅन्ड जवळ इंगळे गल्ली जिजामाता गार्डनच्या बाजूला धाराशिव येथे अंदाजे 3,000 ₹ किंमतीची 30 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-शारदाबाई राजेंद्र काळे, वय 51 वर्षे, रा. भोसले हायस्कुल समोर तांबरी विभाग धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 13.30 वा. सु.आपल्या राहत्या घराचे बाजूला धाराशिव येथे अंदाजे 3,000 ₹ किंमतीची 30 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये धाराशिव शहर पो ठाणे येथे स्वतंत्र 2 गुन्हे नोंदविले आहेत.

आनंदनगर पोलीस ठाणे: आरोपी नामे-गोविंद गोपा राठोड, वय 64 वर्षे, रा. सेवानगर तांडा कदेर ता. उमरगा जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 17.20 वा. सु.सेवालाल कॉलनी धाराशिव येथे अंदाजे 1,500 ₹ किंमतीची 15 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-बायडाबाई छगन काळे, वय 68 वर्षे, रा.काकानगर सांजा ता. जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 18.10 वा. सु.काका नगर सांजा येथे अंदाजे 2,000 ₹ किंमतीची 20 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये आनंदनगर पो ठाणे येथे स्वतंत्र 2 गुन्हे नोंदविले आहेत.

परंडा पोलीस ठाणे: आरोपी नामे-सुनिल मुरलीधर चौधरी, वय 50 वर्षे, रा. देवगाव खुर्द ता. परंडा जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 21.15 वा. सु. जिल्हा परिषद शाळेजवळ देवगाव खुर्द येथे अंदाजे 5,570 ₹ किंमतीची लिटर गावठी दारु व देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

उमरगा पोलीस ठाणे: आरोपी नामे-गोविंद गोपा राठोड, वय 64 वर्षे, रा. सेवानगर तांडा कदेर ता. उमरगा जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 17.20 वा. सु. सेवानगर तांडा कदेर येथे अंदाजे 2,000 ₹ किंमतीची 20 लिटर गावठी दारु साहित्या सह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

कळंब पोलीस ठाणे: आरोपी नामे-संतोष बापु शिंदे, वय 31 वर्षे, रा. महादेव मंदीर टोकण वस्ती कोठाळवाडी येथे जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 17.55 वा. सु. महादेव मंदीर टेकडी वस्ती कोठाळवाडी येथे अंदाजे 750 ₹ किंमतीची 25 लिटर गावठी दारु साहित्या सह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात

आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे: आरोपी नामे-किशोर श्रीमंत महानुरे, वय 40 वर्षे, रा. ईटकळ ता. तुळजापूर जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 00.30 वा. सु. ईटकळ येथे ईटकळ ते अक्कलकोट जाणारे रोडलगबत प्रणिती बार ॲन्ड रेस्टॉरंट येथे अंदाजे 3,040 ₹ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

लोहारा पोलीस ठाणे: आरोपी नामे-महावीर व्यंकट भालेराव, वय 45 वर्षे, रा. सालेगाव ता. लोहारा जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.26.10.2026 रोजी 18.00 वा. सु. सालेगाव ते तोरंबा जाणारे रोडलगत असलेल्या मोकळ्या जागेत एका पत्राचे शेडसमोर अंदाजे 1,050 ₹ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये लोहारा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

" जुगार विरोधी कारवाई."

बेंबळी पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान बेंबळी पोलीसांनी दि.26.10.2026 रोजी 11.45 ते 13.10 वा. सु. बेंबळी पोलीस ठाणे हद्दीत 3 ठिकाणी छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-ज्ञानेश्वर भाउ वाघमारे, वय 38 वर्षे, रा.केशेगाव ता. जि. धाराशिव हे 11.45 वा. सु. केशेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कल्याण मटका जुगाराचे असा एकुण 720 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले बेंबळी पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर आरोपी नामे-अमोल नागनाथ शिंदे, वय 38 वर्षे, रा.केशेगाव ता. जि. धाराशिव हे 12.20 वा. सु. केशेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कल्याण मटका जुगाराचे असा एकुण 620 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले बेंबळी पो. ठाणेच्या पथकास आढळले. तर आरोपी नामे-रवि मनमत खोचरे, वय 36 वर्षे, रा.केशेगाव ता. जि. धाराशिव हे 13.10 वा. सु. केशेगाव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातुन केशेगाव कारखान्याकडे जाणारे रोडलगत कल्याण मटका जुगाराचे असा एकुण 690 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले बेंबळी पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-12 (अ) अन्वये बेंबळी पो ठाणे येथे स्वतंत्र 3 गुन्हे नोंदवले आहेत.

उमरगा पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान उमरगा पोलीसांनी दि.26.10.2026 रोजी 18.30 वा. सु. उमरगा पोलीस ठाणे हद्दीत महादेव रेस्टॉरंटचे बाजूला मोकळ्या जागेत उमरगा येथे छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-शंकर दिगंबर कांबळे, वय 51 वर्षे, रा.बालाजी नगर उमरगा ता.उमरगा जि. धाराशिव हे 18.30 वा. सु. महादेव रेस्टॉरंटचे बाजूला मोकळ्या जागेत उमरगा येथे कल्याण मटका जुगाराचे असा एकुण 1,050 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले उमरगा पो. ठाणेच्या पथकास आढळले.यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-12 (अ) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

" मालमत्तेविरुध्द गुन्हे."

येरमाळा पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-मनोज विष्णु घोलप, वय 49 वर्षे, रा.तेरखेडा ता. वाशी जि. धाराशिव यांचे शेत शिवार गट नं 433 तेरखेडा येथील शेतातील विहरीवरील बसवलेले ओसृवाल कंपनीची 3एचपीची सौरउर्जा मोटार 20,000₹किंमतीची, 50 फट केबल असा एकुण 25,000₹ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.25.10.2026 रोजी 05.00 ते दि. 26.10.2026 रोजी 08.00 वा. सु. चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मनोज घोलप यांनी दि.26.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम 303(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"अपहरण."

धाराशिव शहर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-गंगाधर तानाजी तवार, वय 39 वर्षे,रा. राघुचीवाडी ह.मु. बालाजी नगर धाराशिव ता. जि. धाराशिव यांचा मुलगा नामे-रितेश गंगाधर तवार, वय 15 वर्षे,रा. राघुचीवाडी ह.मु. बालाजी नगर धाराशिव ता. जि. धाराशिव व त्याचा मित्र नामे- युवराज श्रीकांत म्हेत्रे, वय 15 वर्षे, रा. वडगाव सि. ता. जि. धाराशिव हे दि.24.10.2026 रोजी 09.30 वा. सु.जिल्हा परिषद शाळा वडगावसि.धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणासाठी गुप्तपणे व गैरपणे परिरुध्द होणेसाठी अपहरण करुन घेवून गेले. अशा जकुराच्या फिर्यादी नामे-गंगाधर

तवार यांनी दि.26.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे धाराशिव शहर येथे भा.न्या.सं.कलम 137(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"रस्ता अपघात."

धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे : मयत नामे-लहु शिवाजी आवड,रा. आंबेहोळ ता. जि धाराशिव हे दि.25.10.2026 रोजी 16.00 वा. सु.मोटरसायकल क्र एमएच 25 बीजी 6794 वरुन जात होते. दरम्यान वरुडा रोडवरील रेल्वे कूम्पचे पुढे प्रमोद गायकवाड यांचे विट भट्टी जवळ वरुडा शिवारात ट्रॅक्टर क्र एमएच16 एएम0628 चा चालक आरोपी नामे-अहमद चॉद पठाण, रा.दुकडेगाव ता. वडवणी जि. बीड यानी त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर हा हायगयी व निष्काळजीपणे चुकिच्या दिशेने चालवून लहु आवड यांचे मोटरसायकलला समोरुन धडक दिली. या अपघातात लहु आवड हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- दादा शिवाजी आवड, वय 45 वर्षे, रा. आंबेहोळ ता. जि. धाराशिव यांनी दि.26.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम 281, 125(ब), 106(1)(2) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

"लैंगीक अत्याचार."

नळदुर्ग पोलीस ठाणे : एका गावातील 17वर्षीय 7 महिन्याची मुलगी (नाव-गावगोपनीय) दि.01.06.2023 ते आज पावेतो ही अल्पवयीन असताना नातेवाईक यांनी एका गावातील एका तरुणा सोबत लग्न लावून देवून नमुद तरुणानी तिचेशी शारिरीक संबध ठेवल्याने ती सध्या गर्भवती होवून मुलास जन्म दिला आहे.तसेच नमुद तरुणांनी तिचेशी शारिरीक संबध ठेवलयाने तीने दुसऱ्यांदा मुलीस जन्म दिला आहे. अशा मजकुराच्या पिडीतेने दि.26.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या. सं. कलम-64, 64(2)(एम) सह 9, 10 बालविवाह प्रती अधिनियम 2006 सह कलम 4, 6 बा.लै.अ.सं. अधिनियम 2012 अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस